ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 99
Date: 09.01.25

मुंबई मंडळाच्या आस्थापनेवरील
अतिक्रमण निर्मूलन कक्षाबाबत.

---

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
आदेश क्रं. प्राधि./कक्ष निर्मिती/२०२५/ /प्र.७
E-3733743
दिनांक : 08 JAN 2025

**संदर्भ -** १. प्राधिकरण आदेश क्र.प्राधि/ कक्ष निर्मिती/ २०२४/१९२९/प्र.७, दि.२२.०८.२०२४
२.सहमुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ याचेकडील क्र.२४४५, दि.१६:१०.२०२४ रोजीची कार्यालयीन टिपणी

**प्रस्तावना-**

अवर सचिव, नगर विकास विभाग यांच्या दि.२३.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई क्षेत्राच्या अभिन्यासातील क्षेत्रासाठी व प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करण्यात आलेले आहे. म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण घोषित केल्यानंतर मुंबई मधील ११४ अभिन्यासातील महाराष्ट्र नगर रचना अधिनियम कायदा अन्वये अतिक्रमण निर्मूलनाची जबाबदारी म्हाडाकडे आलेली आहे.

२. म्हाडाच्या जमिनीवरील अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी व निष्कासनाची कार्यवाही करण्यासाठी येणा-या अडचणींवर मात करण्यासाठी कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे कार्यक्षेत्रातील वसाहती मधील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे विरोधी कार्यवाही प्रभावीपणे करण्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याचा निर्णय प्राधिकरण ठराव क्र.६८३३, दि.२५.०२.२०१९ अन्वये घेण्यात आला आहे.

३. सदर प्राधिकरण ठराव क्र.६८३३, दि.२५.०२.२०१९ अन्वये अतिक्रमण निर्मूलन कक्ष स्थापन करून सदर कक्षामध्ये उपजिल्हाधिकारी १ यांच्या अधिपत्याखाली २ तहसिलदार, २ नायब तहसिलसदार अथवा ४ उपअभियंता, ८ शाखा/कनिष्ठ /सहायक अभियंता, १ लेखापाल,१ सहायक, २ वरिष्ठ लिपीक,४ कनिष्ठ लिपीक -टंकलेखक, ४ शिपाई, अशा अधिकारी/कर्मचारी वर्गाचा समावेश करून आकृतीबंधामध्ये वाढ करण्याबाबत प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे.

४. तथापी, मा.मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांचे कार्यालयीन टिपणीच्या अनुषंगाने उक्त पदांच्या निर्मितीकरीता शासन स्तरावरून मान्यता मिळेपर्यंत सदर कक्ष तात्पुरत्या स्वरूपात कार्यान्वयीत होण्याकरीता सदर कक्षाचा अतिरिक्त कार्यभार प्राधिकरण आदेश क्र.१९२९, दि.२२.०८.२०२४ अन्वये खालील अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

अतिक्रमण निर्मूलन कक्ष /मुंबई मंडळ

| अ क्र | अधिका-यांचे नांव, पदनाम व कार्यालय | शेरा |
|---|---|---|
| १ | श्री सागर वीर, उप अभियंता, का.अ./वांद्रे/मुंबई मंडळ | उप अभियंता /अतिक्रमण निर्मूलन कक्ष (पूर्व विभाग) / मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| २ | श्री मष्णाजी वि.माकणे, उप अभियंता का.अ/गोरेगांव/ मुंबई मंडळ | उप अभियंता /अतिक्रमण निर्मूलन कक्ष (पश्चिम विभाग) / मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| ३ | श्री सागर गो.इंगळे, सहा. अभियंता का.अ/कुर्ला/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता/अतिक्रमण निर्मूलन कक्ष (पूर्व विभाग)/मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| ४ | श्री स्वप्निल वि.सोनावणे, कनिष्ठ अभियंता का.अ/शहर/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता/अतिक्रमण निर्मूलन कक्ष (पश्चिम विभाग)/मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| ५ | श्री सुरज नाडे, कनिष्ठ अभियंता का.अ/वांद्रे/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता /अतिक्रमण निर्मूलन कक्ष (पूर्व विभाग) /मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |
| ६ | श्री आकाश आकोलकर, कनिष्ठ अभियंता का.अ/बोरीवली/मुंबई मंडळ | सहायक/शाखा/कनिष्ठ अभियंता/अतिक्रमण निर्मूलन कक्ष (पश्चिम विभाग)/ मुंबई मंडळ या विभागा अंतर्गत कामकाज पहावयाचे आहे |

सहमुख्य अधिकारी/ मुं.मं. यांचे संदर्भीत २ वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने यामध्ये अंशत: सुधारणेसह पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**आदेश :-**

१. अतिक्रमण निर्मूलन कक्षामधील उक्त उपअभियंता व शाखा/कनिष्ठ/सहायक अभियंता हे म्हाडाच्या अभिन्यासातील इमारती /म्हाडा मार्फत बांधण्यात आलेल्या इमारती अशा प्रकारच्या बांधकामांसाठी (झोपड्या तसेच त्यासारखी अतिक्रमणे वगळून) यांनी अनधिकृत/अतिक्रमणाबाबतची कार्यवाही संबंधित उपअभियंता आणि मिळकत व्यवस्थापक यांचे समवेत समन्वय साधून अतिक्रमण निर्मूलनाबाबतच्या प्रकरणाची कार्यवाही विशेष कार्य अधिकारी (एम्पॅनल्ड) तथा अतिक्रमण निर्मूलन कक्ष प्रमुख यांच्या अधिपत्याखाली करावयाची आहे. सदर कामाकरिता अतिक्रमण निर्मूलन कक्षातील उक्त पदे पदनिर्देशित करण्यात येत आहेत. झोपड्या तसेच त्यासारखी अतिक्रमणे, मोकळ्या भुखंडावरील अतिक्रमणे व त्यासारखी अतिक्रमणे या संदर्भात कार्यवाही ही संबंधित उपअभियंता यांनी करावयाची आहे.

२. अतिक्रमण निर्मूलन कक्ष प्रमुख यांनी अतिक्रमण कक्षातील सर्व कामकाज सहमुख्य अधिकारी/मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचे मान्यतेने करावयाचे आहे.

३. म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण दर्जा प्राप्त झाल्यामुळे अतिक्रमण निर्मूलन कक्षातील पदांच्या मान्यतेसह मुंबई मधील म्हाडाच्या ११४ अभिन्यासातील अतिक्रमण निर्मूलन कक्षासाठी पदनिर्देशीत अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत प्रशासकीय अधिकारी/मुंबई मंडळ यांचे पत्र क्र.६८५/२०२०, दि.२.९.२०२० अन्वये प्रस्ताव शासनास पाठविला आहे. त्यानुसार मुंबई मंडळांतर्गत *तांत्रिक* व *अतांत्रिक*

विभागातील संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांनी अतिक्रमण निर्मूलन कक्षातील पदनिर्देशीत अधिकारी यांचेसोबत समन्वय ठेवून अतिक्रमण निर्मूलनाबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही पार पाडावयाची आहे.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या अनुषंगाने तांत्रिक व अतांत्रिक पदनिर्देशित अधिकारी यांनी पार पाडावयाच्या कार्याची विभागणी**

| अ.क्र | मिळकत व्यवस्थापक पदनिर्देशित अधिकारी (अतांत्रिक) | उपविभागाचे उपअभियंता पदनिर्देशित अधिकारी (तांत्रिक) | अतिक्रमण निर्मुलन कक्षाचे संबंधित विभागाचे उपअभियंता तथा पदनिर्देशीत अधिकारी (तांत्रिक) |
|---|---|---|---|
| १ | (i) कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत विभागास तक्रार प्राप्त झाल्यास अथवा क्षेत्रीय भेटीदरम्यान अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे क्षेत्रीय कर्मचारी यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर विहीत नमुन्यातील अनधिकृत बांधकामाचा स्थळपाहणी अहवाल तयार करणे.<br>(ii) सदरचा अहवाल संबंधित उपविभागाचे तांत्रिक पदनिर्देशित अधिकारी असलेले उपअभियंता यांचे कार्यालयास पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने पाठविणे. | (i) कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत विभागास तक्रार प्राप्त झाल्यास अथवा मिळकत व्यवस्थापक विभागाकडून स्थळ पाहणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अनधिकृत बांधकामाचे स्थळी प्रत्यक्ष पाहणी करून अधिनस्त तांत्रिक कर्मचारी यांचेकडून अतिक्रमित कामाचे मोजमाप घेऊन नकाशा तयार करणे.<br>(ii) MRTP Act. १९६६ नुसार अनधिकृत बांधकामाचे मोजमाप नमूद करून उचित नोटीस देणे व नोटीसीप्रमाणे विहीत मुदतीत विधीवत पुरावे भोगवटाधारकाकडून प्राप्त न झाल्यास पुढील कारवाईकरीता अहवाल अतिक्रमण निर्मूलन कक्षाकडे पाठविणे. | (i) संबंधित उपअभियंताकडून प्राप्त नोटीस व तदनुषंगिक अहवालानुसार तोडक कारवाईच्या दृष्टीने नियोजन करणे (पोलीस बंदोबस्त, म.सु.ब. बंदोबस्त, तोडक यंत्रणा)<br>(ii) तोडक कारवाईच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाची वसुली व तोडक कारवाईसाठी नेमण्यात आलेल्या खाजगी यंत्रणेचे देयक अदायगी बाबत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही सहमुख्य अधिकारी/ मुं.मं. यांचे मान्यतेने पार पाडणे. |
| २ | अतांत्रिक पदनिर्देशीत अधिकारी व अतिक्रमण निर्मूलन कक्ष प्रमुख यांनी प्रत्यक्ष तोडक कारवाई वेळी क्षेत्रीय कर्मचारी/ भाडेवसुलीकार यांसह उपस्थित राहणे. | संबंधित विभागाचे पदनिर्देशीत अधिकारी यांनी प्रत्यक्ष तोडक कारवाई वेळी अधिनस्त क्षेत्रिय अधिकारी/कर्मचा-यांसह उपस्थित राहणे. जसे की, सहायक अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, तांत्रिक सहायक/ भूमापक इ. | प्रत्यक्ष तोडक कारवाई वेळी अतिक्रमण निर्मूलन कक्ष प्रमुख यांचे अधिपत्याखाली अतिक्रमण निर्मूलन कक्षातील पदनिर्देशीत उपअभियंता MRTP Act. १९६६ नुसार सर्व अनुषंगिक कारवाई करतील. |

४. सदर नवनिर्मित कक्षाकरीता आवश्यक असलेले विभागीय लेखापाल, सहायक, वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपिक-टंकलेखक व शिपाई या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावयाची आहे.

५. उपरोक्त नमूद पदनिर्देशीत अधिकारी/अभियंत्यांनी नियोजन प्राधिकरण अंतर्गत मिळालेल्या अधिकारानुसार MRTP Act. १९६६ नुसार अनधिकृत बांधकाम निष्कासनाबाबतची नेमून दिलेली कार्यवाही सध्याचा कार्यभार सांभाळून पार पाडावयाची आहे.

सदरहू आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./ प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

**(निलीमा धायगुडे)**
**सचिव / प्राधिकरण**

**प्रति,**
**(--------------------------------------------)**
**(संबंधित अधिकाऱ्यांना विभाग प्रमुखांमार्फत)**

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित</u> :**
१) मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ
३) मुख्यअभियंता-१, २, ३/प्रा.
४) वित्त नियंत्रक/प्रा.
५) विधी सल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७) मुख्यवास्तुशास्त्रज्ञ/प्रा
८) सक्षम प्राधिकारी, १-२/प्रा
९) अतिक्रमण निर्मुलन कक्ष /मुं.मं
१०) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष/प्रा (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)
११) मुख्य जनसंपर्कअधिकारी/प्रा.
१२) चौकशी अधिकारी/प्रा

**प्रत -**
१. मुख्य लेखाधिकारी / मुंबई मंडळ
२. लेखाधिकारी / प्रा.
३. प्रशासकीय अधिकारी / प्रा./मुंबई मंडळ
४. कार्यासन अधिकारी / प्रा.

**प्रत माहितीसाठी,**
मा. उपाध्यक्ष / प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
**प्रत** : प्रशा. ८/९/११/१३/१४/प्रा.